# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०२२

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | |
|---|---|---|
| **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | : | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित (मुख्य कंपनी) व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) यांचा एकत्रित वार्षिक अहवाल तसेच मुख्य कंपनी व उपकंपनीचे सन २०१८-२०१९ चे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **डॉ. किरण लहामटे, सर्वश्री. सुनिल भुसारा, नितीन पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"आदिवासी जमीन हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र महसूल अधिनियम कलम ३६ व ३६ अ नुसार निर्बंध घालण्यांत येणे, त्यामुळे एखाद्या आदिवासी भोगवटा जमीन धारकाला अन्य आदिवासी व्यक्तींला जमीन विकायची असेल तर कलम ३६ (२) नुसार जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक असणे व एखाद्या आदिवासी भोगवटा जमीन धारकाला बिगर आदिवासीला जमीन हस्तांतरण करायची असेल तर कलम ३६ (अ) नुसार राज्य शासनाची परवानगी घेण्याची कायद्यांतर्गत तरतूद केलेली असणे, तथापि पेसा कायद्यातील वरील तरतुदीच्या अनुषंगाने जमीन महसूल संहिताच्या कलम ३६ अ मध्ये सुधारणा अनिवार्य असल्याने मा.राज्यपाल महोदयांनी पाचव्या अनुसूचीतील परिच्छेद ५ (१) च्या अधिकारात दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या अधिसूचनेव्दारे कलम ३६ अ च्या पहिल्या परंतुकानंतर कलम ३६ अ (१) परंतुक दुसरेमध्ये "राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील गावांमध्ये ग्रामसभेची मंजुरी मिळाल्याशिवाय आदिवासी व्यक्तींचा भोगवटा बिगर आदिवासी व्यक्तींकडे हस्तांतरित करण्यास जिल्हाधिकारी यांनी मंजुरी देऊ नये" अशी

सुधारणा करुन त्याप्रमाणे तरतूद केलेली असणे, तथापि अशा तरतुदी असल्या तरी राज्यात अनेक आदिवासी जमिनींचे बिगर आदिवासींना हस्तांतरण झालेले असणे, त्यामुळे बनावट कागदपत्रे तयार करुन जमिनी खरेदी करण्यांत आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी अशाप्रकारे बेकायदेशीर हस्तांतरण झालेल्या जमिनी पुन्हा आदिवासींना प्रत्यार्पित करण्यासाठी तसेच असे कृत्य करणाऱ्यांवर व यामधील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, परंतु त्याप्रकरणी कारवाई करण्यांत न येणे, परिणामी राज्यातील आदिवासी समाजांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. नाना पटोले, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, श्री. विकास ठाकरे, कुमारी प्रणिती शिंदे, श्री. अमीन पटेल, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. जितेश अंतापूरकर, कुणाल पाटील, सुभाष धोटे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत मोठया प्रमाणात अनियमितता असून त्याबाबत रितसर अनेक तक्रारी होऊनही पोलिस अधिक्षक यवतमाळ हे गुन्हा दाखल करुन घेत नसल्याचे नुकतेच उघडकीस येणे, सदर बँकेने व संचालक मंडळाने संगनमत करुन बनावट कर्ज दुसऱ्याच्या नांवे वाटप करणे, या बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या पतीच्या नावे कोट्यावधीचे बनावट कर्ज वाटप केलेले असून ते सध्या बुडीत असणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक मंडळ व बँकेचे अधिकारी हे कर्जदारांचे मालमत्ता जप्त करुन या मालमत्तेचा कमी किंमतीत लिलाव करणे, सदरची बँक रिझर्व्ह बँकेची कोणतीही मार्गदर्शक तत्वे पाळत नसणे, १० वेगवेगळया कंपनीच्या नांवे २२७ कोटींचे कर्ज या बँकेने तारणाशिवाय मंजूर करणे, ते सध्या बुडीत असणे, सदरचे व्यवहार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ व आरबीआयच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असणे, हे प्रकरण सन २०१४ पासून सुरु असून बँक जुने दस्तऐवज नष्ट करीत असणे, या बँकेचे सदरील प्रकरण गंभीर असून या प्रकरणात शेकडो कोटींचा आर्थिक गैरव्यवहार झाला असणे, त्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करुन येथील मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य दोषी अधिकारी यांच्यावर फौजदारी कारवाई व्हावी तसेच यामध्ये मोठा अपहार झाला असल्याने हे प्रकरण सखोल चौकशीसाठी सक्त वसूली संचालनालय (ईडी) कडे सोपविण्यात यावे अशी होत असलेली मागणी, परंतू यासंदर्भात कारवाई करण्यास शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी या बँकेच्या खातेदारांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री. रविंद्र वायकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

शामनगर तलाव, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जुना व नैसर्गिक मजास नाला कल्पतरु विकासकामार्फत मातीने बुजवून व त्यावर पत्रे लावून अतिक्रमण करण्यात येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, तसेच मजास नाल्याच्या दुतर्फा असलेली संरक्षक भिंत दोन ठिकाणी अनधिकृतरित्या तोडून विकासाच्या नावाखाली मातीचे भराव टाकण्याचे काम बेकायदेशीररित्या करण्यात येत असणे, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील विविध भागातील मुख्य लोकवस्तींमधील पर्जन्यवृष्टीचे पाणी व सांडपाणी वाहून नेणारा मजास हा एकमेव मुख्य नाला असून तो अशाप्रकारे अतिक्रमण करुन बुजवल्यास आसपासचा संपूर्ण परिसर पावसाळ्यात पाण्याखाली येण्याची शक्यता असणे, तसेच मजास नाल्याचा प्रवाह बंद होऊन आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी निर्माण होऊन स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे, तसेच सदर नाल्याची व आजूबाजूच्या परिस्थितीची पाहणी न करता या नाल्यावर ५ ठिकाणी पूल बांधण्याची परवानगी दिल्यामुळे हा नाला अधिकच अरुंद होणे, प्रस्तुत गंभीर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी महानगरपालिका प्रशासनाकडे लेखी तक्रारी दाखल करुनही याकडे जाणुनबुजून होत असलेले दुर्लक्ष, यात विकासकासोबत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेही आर्थिक संगनमत असण्याची शक्यता, त्यामुळे या प्रकरणी महानगरपालिकेकडून कोणतीही कारवाई न होणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**(दुपारी २-०० वाजता)**

**चार** : **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : **सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प सादर करतील.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १० मार्च, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

विधानसभा अस्सल प्रत